RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ७, अंक १२३] शनिवार, ऑक्टोबर ९, २०२१/आश्विन १७, शके १९४३ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २७९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ ऑक्टोबर २०२१.

**आदेश**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम.**

क्रमांक मुद्रांक. २०२१/अनौ-३०/प्र.क्र. ३१५/एम-१(धोरण).—महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा ६०) (यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, जनहितार्थ तसे करणे आवश्यक असल्याची खात्री पटल्याने, याद्वारे, मुंबईतील वरळी, नायगाव, ना. म. जोशी मार्ग आणि शिवडी येथील मुंबई विकास विभागाच्या (बीडीडी) एकूण दोनशे सात चाळींमधील पात्र भाडेकरूंचे पुनर्वसन करण्यासाठी त्यांना देण्यात येत असलेल्या निवासी युनिटांच्या बाबतीत, अशा पात्र भाडेकरूंच्या नावे, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाने (म्हाडा) निष्पादित करावयाच्या संलेखावर, उक्त अधिनियमास जोडलेल्या अनुसूची एक च्या अनुच्छेद २५ च्या खंड (ब) अन्वये अन्यथा आकारणीयोग्य असलेले मुद्रांक शुल्क कमी करीत आहे आणि केवळ एक हजार रुपये इतके मुद्रांक शुल्क निश्चित करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**श्रीधर डुबे-पाटील,**
शासनाचे सहसचिव.

**REVENUE AND FORESTS DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 8th October 2021.

**ORDER**

MAHARASHTRA STAMP ACT.

No. Mudrank. 2021/UOR.30/C.R. 315/M-1(Policy).—In exercise of the powers conferred by clause *(a)* of section 9 of the Maharashtra Stamp Act (LX of 1958) (hereinafter referred to as "the said Act"), the Government of Maharashtra, being satisfied that it is necessary to do so in the public interest, hereby reduces and fixes the stamp duty at Rupees One Thousand only as otherwise chargeable under clause *(b)* of Article 25 of Schedule I appended to the said Act, on the instrument to be executed by the Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) in favour of the eligible tenants in a total Two Hundred and Seven chawls of Bombay Development Department (BDD) at Worli, Naigaon, N. M. Joshi Marg and Siwri in Mumbai in respect of residential units given to such eligible tenants for their rehabilitation.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SHRIDHAR DUBE-PATIL,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.